## प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड
## सेवापूर्ती गौरवग्रंथ

# महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय




संपादक

डॉ. पांडुरंग भोसले
डॉ. सचिन रुपनर
प्रा. संग्राम गोसावी


Scanned by CamScanner

प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड सेवापूर्ती गौरवग्रंथ

# महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय

संपादक

डॉ. पांडुरंग भोसले

डॉ. सचिन रुपनर

प्रा. संग्राम गोसावी

समीक्षा पब्लिकेशन

Scanned by CamScanner

प्रकाशक क्रमांक : २१०

Maharashtratil Bhakti Sampraday

**महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय**

**संपादक :** डॉ. पांडुरंग भोसले
डॉ. सचिन रुपनर
प्रा. संग्राम गोसावी

**प्रकाशन – समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर.**

प्रकाशक - श्री. प्रविण अनिलराव भाकरे,
शंकर-पार्वती निवास, ढोले गल्ली, रांझणी,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर - ४१३ ३०४
मो. ९६८९१४१२०१ / ८६०५५१२७४२

**© प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड**
'हरिनामवेल', कृषी उत्पन्न बाजार समितीमागे,
मंचर, जि. पुणे - ४१० ५०३
मो. नं. ९७६७२२२७११

**मुद्रण :** एक्सेल प्रिंटींग प्रेस, पुणे

**मुखपृष्ठ :** संतोष घोंगडे

**प्रथमावृत्ती :** २८ मे, २०२२

**अक्षरजुळणी :** समीक्षा टाईपसेटर्स, पंढरपूर

ISBN : ९७८-९३-९४६२२-४७-०

**किंमत :** ३५०/- रु.

**टीप :** या पुस्तकातील लेखकांच्या लेखांमधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**समीक्षा पब्लिकेशनची सर्व पुस्तके bookganga.com या संकेतस्थळावर ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध आहेत.**

Scanned by CamScanner

# अनुक्रम


१. **संत मेळ्याच्या अभंगातील वैचारिक जाणिवा**
प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे / ११

२. **संत तुकारामांच्या साहित्यातील समाजविचार**
प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड / २१

३. **स्त्री संतांची परंपरा : एक भगवी पताका**
प्राचार्य डॉ. शिवाजी निवृत्ती मोहिते / २७

४. **संत जनाबाईंचे अभंग : स्त्री जीवनाचा उत्कट काव्यमय अविष्कार**
प्राचार्य डॉ. शोभा बाळासाहेब इंगवले / ३९

५. **आनंद संप्रदाय आणि माणदेशी परंपरा**
प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी / ४५

६. **वारकरी संप्रदाय व आद्यकीर्तनकार संत नामदेव**
प्राचार्य डॉ. भगवानसिंह राजपूत/ डॉ. सौ. मनिषा दयाघन पाटील / ५१

७. **भक्ती संप्रदायाचे स्वरूप, विशेष व वाटचाल**
डॉ. ज्योती परब / ५६

८. **भक्ती संप्रदायांचे सामाजिक योगदान**
डॉ. सीमा नाईक-गोसावी / ७०

९. **महानुभावीय तत्त्वज्ञान आणि आचारधर्म**
डॉ. शीतल कोरडे / ७५

१०. **महानुभावीय गद्य वाङ्मय**
डॉ. अतुल नारायण चौरे / ८०

११. **महानुभावांचे पद्यवाङ्मयाचा परिचय**
डॉ. विक्रम जाधव / ८६

१२. **महाराष्ट्रातील मुस्लिम (सूफी) संप्रदाय**
डॉ. पांडुरंग भोसले / ९३

१३. **नागेश संप्रदाय**
डॉ. सचिन सि. रुपनर / १००




Scanned by CamScanner

१४. **महाराष्ट्रातील ख्रिस्ती संप्रदाय**
डॉ. वर्षा देसाई - रुपनर /१०७
१५. **दत्त संप्रदाय**
डॉ. संदीप वाकडे / ११२
१६. **वीरशैव संप्रदायाचे स्वरूप व वाङ्मयीन कार्य**
प्रा. बाळू तिखे / ११७
१७. **वारकरी संप्रदायाचे स्वरुप**
सौ. प्रमिला मनोहर भालके /१२४
१८. **संत ज्ञानेश्वरांचे वाङ्मयीन कार्य : एक शोध**
प्रा. डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील /१३३
१९. **संत नामदेव : 'तीर्थावळी'चे अभंग**
प्रा. गोविंद मुंढे /१३८
२०. **संत नामदेवांची विठ्ठलभक्ती**
डॉ. पौर्णिमा कोल्हे / १४४
२१. **संत चोखामेळा : उपेक्षित, अस्वस्थ जाणिवेचा अविष्कार**
प्रा. ज्ञानेश्वर अशोक तिखे / १४९
२२. **महाराष्ट्राचे महान संत : चोखामेळा**
डॉ. चंद्रकांत कांबळे / १५५
२३. **संत सोयराबाई ह्यांच्या काव्य आणि अभंगाचे मूल्यमापन**
डॉ. संदीप सांगळे /१६२
२४. **वारकरी संप्रदायातील संत जनाबाईंची अभंगवाणी**
डॉ. विकास बहुले /१७०
२५. **संत एकनाथांच्या भारुडांमधील समाजदर्शन**
डॉ. प्राजक्ता प्रल्हादराव निकम / १७९
२६. **संत तुकाराम : व्यक्तित्व आणि कवित्व**
डॉ. शहाजी पाटील / १८६
२७. **सर्वश्रेष्ठ : संत तुकाराम**
डॉ. संजयकुमार सरगडे / १९२
२८. **संत तुकारामांच्या अभंगातील समाजचिंतन**
प्रा. डॉ. रमेश पोळ /१९६



Scanned by CamScanner

२९. संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिक जाणिवा
डॉ. अमोल चांदेकर / २०१
३०. संत तुकारामांच्या अभंगातील विठ्ठल वर्णन व दृष्टांत
सौ. हर्षाली संदीप लोखंडे / २१२
३१. तुकाराम ते जगद्गुरु संत तुकाराम : एक दृष्टिक्षेप
डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात / २२०
३२. संत तुकारामांच्या अभंग वाङ्मयाचे विशेष
प्रा. डॉ. सौ. मंगल एकनाथ डोंगरे /२२८
३३. अक्षर पंढरीचा वारकरी संताजी जगनाडे महाराज
डॉ. रामचंद्र मोरेश्वर वासेकर /२३६
३४. संत कवयित्रींच्या वाङ्मयातील माणूसपणाचे भान
प्रा. डॉ. सायली योगेश आचार्य / २४०
३५. संत साहित्यातून होणारे सामाजिक प्रबोधन
डॉ. राजेंद्र खंदारे / २४९
३६. नैतिक मूल्यांची शिकवण देणारे संतसाहित्य
डॉ. बाबासाहेब शेंडगे /२५७
३७. वारकरी आभूषणे
प्रा. ज्ञानेश्वर भोसले / २६२
३८. स्वामी स्वरुपानंदांच्या 'स्वरुप पत्र मंजूषा' मधील नीतिबोध
डॉ. महेश सखाराम बावधनकर / २७२
३९. नाथ संप्रदायाचे स्वरूप आणि महाराष्ट्रातील परंपरा
प्रा. अमोल सुभाष कवडे / २८५
४०. समर्थ संप्रदायाचे साहित्य : स्वरूप आणि विशेष
प्रा. डॉ. रेश्मा रमेश दिवेकर / २९०
४१. समर्थ रामदास यांचे मनाचे श्लोक : एक आकलन
डॉ. पद्माकर दिगंबर वानखेडे / २९९
४२. समर्थ संप्रदायातील संत : वेणाबाई
डॉ. राजेंद्र सा. बावळे / ३०४
४३. महाराष्ट्रातील यादवकालीन भक्ती संप्रदाय
प्रा. संग्राम सीताराम गोसावी / ३०७



Scanned by CamScanner

# १९. संत नामदेव : 'तीर्थावळी'चे अभंग

प्रा. गोविंद मुंढे
अण्णासाहेब आवटे कॉलेज,
मंचर (पुणे)

**प्रास्ताविक :**

प्राचीन काळापासून महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाची परंपरा सुरू झाली. या मध्ययुगीन कालखंडात वारकरी संप्रदायाचा उदय झाला. यामध्ये विविध जातीधर्मातील संत निर्माण झाले. या संप्रदायातील संतांनी महाराष्ट्रातील जनमानसावर छाप सोडली. हा महाराष्ट्र म्हणूनच तर वेगवेगळ्या जाती धर्माचे आणि संस्कृतीचे प्रमुख केंद्र ठरले आहे. म्हणूनच या भूमीला संतांची व वीरांची भूमी असे संबोधले जाते. यातील काही संतांना राष्ट्रीय संत म्हणून मानाचे स्थान लाभले आहे. याच संतांनी व वारकरी संप्रदायाने महाराष्ट्रातील सामान्य जनतेला भक्तीचा साधा-सोपा मार्ग सांगून 'नाममहिमा' पटवून देऊन परमार्थाचा सोपा मार्ग दाखवून दिला. ईश्वरप्राप्तीसाठी कोणत्याही प्रकारचे कर्मकांड न करताही ईश्वर मिळवता येतो. हे त्यांनी स्वानुभवातून पटवून दिले. अशा या महाराष्ट्राच्या थोर भूमीवर वारकरी संप्रदायातील तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, निवृत्तीनाथ, चोखामेळा, गोरा कुंभार, सावतामाळी, नरहरी सोनार, जनाबाई, बहिणाबाई अशा अनेक संतांनी ईश्वराविषयी असणारी आपुलकी प्रेमभावना जागृत करून त्यांनी या महाराष्ट्रभूमीवर आपले अस्तित्व निर्माण केले. या सर्वच संतांनी आपल्या अभंगवाणीतून व कीर्तनातून जनसामान्यांना उपदेश केला आणि काही ग्रंथरचना केली. अशा या संत माहात्म्यामधील एक श्रेष्ठ संत म्हणजेच संत नामदेव होय. म्हणूनच या शोधनिबंधामध्ये संत नामदेवाच्या 'तीर्थावळी' विषयक अभंगाचा विचार केला आहे.

**संत नामदेवांचे जीवन व कार्य :**

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय हा सर्वाधिक लोकप्रिय असणारा संप्रदाय आहे. याच संतांच्या मांदियाळीतील एक प्रमुख नाव म्हणजे संत शिरोमणी नामदेव ज्यांनी अनेक अभंग रचले. वारकरी संप्रदायाचे थोर प्रचारक व प्रसारक म्हणून त्यांना ओळखले जाते. संत नामदेवांनी भारत भ्रमण केले. संत नामदेव हे आपल्या कीर्तनकलेमुळे प्रत्यक्ष पांडुरंगाला डोलायला लावणारी अशी त्यांची कीर्ती होती. संत नामदेव हे वारकरी



Scanned by CamScanner

संप्रदायाचे महान प्रचारक असून भारतभर त्यांनी त्या बाबतीत भावनिक एकात्मता साधली. भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत घेऊन जाण्याचे कार्य त्यांनी केले. भागवत धर्माचे एक आद्यप्रचारक म्हणून संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीनंतर सुमारे पन्नास वर्षे भागवत धर्माचा प्रचार प्रसार केला. प्रतिकूल परिस्थितीमध्ये महाराष्ट्राची भावनिक एकात्मता जपण्याचे अवघड काम त्यांनी केले.

ज्ञानदेवांनंतर नामदेव ५४ वर्षे जगले. या काळात महाराष्ट्रातल्या खालावत जाणाऱ्या राजकीय परिस्थितीत नामदेवांनी लोकांचे भावबळ टिकून ठेवण्याचे मोठे सांस्कृतिक कार्य केले. सांसारिकांना खडतर योगाऐवजी भक्तीची वाट ज्ञानदेवांनी दाखवली, हे खरे असले तरी त्याचा विचार समाजमनात प्रत्यक्ष रुजवला तो नामदेवांनी. नामदेवांनी ज्ञानदेवांच्या तत्वबोधाचे लोण सर्वसामान्यापर्यंत पोचविले नसते, तर त्यांचे मौलिक विचार ग्रंथातच बंदिस्त होऊन राहिले असते. ''मराठी संतांचा तत्त्ववेत्ता जरी ज्ञानदेव असला, तरी त्यांचा खरा प्रणेता नामदेवच होय.''[१] असे नामदेवांच्या कार्याचे महत्त्व यथार्थपणे अभ्यासकांनी नोंदवले आहे. संत हा लोकातच असतो याची जाणीव आपल्या चरित्राच्या रूपाने नामदेवांनी करून दिली. त्यांचे समग्र जीवन हा भक्तीचा वस्तुपाठ होता. त्यामुळे बहुजनांमधील संतांमध्ये भक्तीमार्गात शिरण्याचा आत्मविश्वास आला. तेराव्या शतकात तळागाळातील संतांचा उदय ही नामदेवांच्या शिकवण्याची फलश्रुती म्हणावी लागेल. अठरापगड जातीतल्या संतांना त्यामुळे अभंगलेखनाची प्रेरणा मिळाली. जनसामान्यांच्या आत्मविकासासाठी, त्यांना मानवेल असा 'नामा'चा सोपा मंत्र नामदेवांनी दिला. त्याला 'नामदेव' म्हणून प्रतिष्ठा मिळाली. 'नाम हेच कर्म । नाम हेचि ब्रह्म ।' मानले. महाराष्ट्राच्या भक्ती परंपरेत 'नाम' या शब्दावर सर्वार्थाने नाममुद्रा कोरली गेली ती नामदेवांची.

विठ्ठलाची एकनिष्ठ उपासना, भावभक्ती आणि वारकरी संप्रदायाचा प्रसार ही नामदेवांची सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक कामगिरी होय. त्यांचे स्वतःचे जीवन तर विठ्ठलमय झालेले होतेच, पण विठ्ठलाचे नाव त्यांनी जनमुखातही रुजवले ते थेट पंजाबपर्यंत. म्हणून पंजाबमधील शीख बांधवांना ते आपले वाटतात. शीख बांधव 'नामदेव बाबा' म्हणून त्यांचे गुणगान गातात. पंजाबमधील 'शब्दकीर्तन' व महाराष्ट्रातील 'वारकरी कीर्तन' यात विलक्षण साम्य आहे. तरीही संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाची पताका पंजाबपर्यंत फडकविली.

अशा या संत नामदेवांच्या नावावर सुमारे २५०० हजार अभंग आढळतात. 'शतकोटी तुझे करीन अभंग' ही त्यांची प्रतिज्ञा होती. 'वाल्मिकीने शतकोटी रामायण



Scanned by CamScanner

रचले त्याच धर्तीवर शतकोटी अभंग रचण्याची कल्पना नामदेवांना सुचली असावी, असे कै. सोनोपंत दांडेकरांचे मत आहे. पण आज नामदेवांचे फक्त अडीच हजार अभंग उपलब्ध आहेत. एवढे मात्र खरे. ''रामदास तुकारामांप्रमाणे जरी त्यांची काव्य दृष्टी पूर्णपणे सजग नसली, तरी त्यांच्या अंतर्मुखतेतून आणि आत्मविस्मृतीतून जे काव्य जन्मले, ते अत्यंत उत्कट असे आहे.''[२] शं. गो. तुळपुळे म्हणतात. संत नामदेवांनी शौरसेनी भाषेत काही अभंगांची रचना केली, तर काही त्यातील शीख पंथाच्या 'गुरुग्रंथसाहेब'मध्ये गुरुमुखी लिपीत घेतलेले आहेत. संत नामदेवांनी त्यांच्या आदी, समाधी व तीर्थावळी यातून ज्ञानेश्वरांचे चरित्र उलगडून दाखविले आहे. संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीनंतर सुमारे पन्नास वर्षे भागवत धर्माचा प्रचार संतश्रेष्ठ नामदेव यांनी केला. प्रतिकूल परिस्थितीमध्ये महाराष्ट्राची भावनिक एकात्मता जपण्याचे अवघड काम संत नामदेवांनी केले. त्यांच्या कामातूनच पुढे रामानंद, कबीर, नानक, दादू दयाल, मीरा, नरसी मेहता अशा संतांची मांदियाळी देशभर उभी राहिली. महाराष्ट्र आणि पंजाब बरोबरच राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, हरियाणा, उत्तरांचल, हिमाचल प्रदेशमध्ये संत नामदेवांची मंदिरे आहेत.

**संत नामदेवांचे तीर्थावळीचे अभंग :**

वास्तविक पाहता 'तीर्थावळी' संबंधी नामदेव फारसे उत्सुक नव्हते. हे आपल्याला त्यांच्या अभंग रचनेवरून जाणवते. कारण आपल्या परमेश्वरापासून दूर जाण्याचे भय त्यांच्या मनात निर्माण झाले असल्याने त्यांनी 'तीर्थावळीपर काही अभंगरचना केली. तीर्थावळीकडे एक कथाकाव्य म्हणून पाहायचे ठरवले की, तत्संबंधीचे सारे प्रश्न सुटू लागतात. या तीर्थावळीच्या अभंगांचे वास्तव लौकिक, अलौकिक व मिश्रित असे कथावास्तव आहे. तीर्थावळी ही तीर्थयात्रा असली तरी तीर्थावळीच्या अभंगांना तीर्थयात्रा वर्णनाचे रूप येऊ शकलेले नाही. म्हणूनच प्रस्तुत यात्रेत संत नामदेवांनी कोणती तीर्थस्थळे पाहिली हा प्रश्न उपस्थित होतो. त्यासंबंधी संत नामदेव विशेष अशी माहिती सांगत नसल्याने काही तक्रारही करता येत नाही. परंतु तीर्थावळीत तीर्थयात्रा तर आहेच पण त्याहूनही अधिक महत्त्वाचे मौल्यवान व अपूर्व आहे, ते नामदेवांचे अनुभवविश्व होय. अशा कितीतरी लहानमोठ्या प्रसंगाने नामदेवांनी तीर्थावळीच्या अभंगांना वेगळे कथास्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे.

या सगळ्या प्रसंगांचे स्वरूप भिन्नभिन्न असले तरी त्यांचा रोख एकाच दिशेकडे आहे असे दिसते. या सगळ्या प्रसंगावरून नामदेव विठ्ठलाचा आपल्यावरील व विठ्ठलावरील आपला असणारा प्रेमभाव त्यांचे तीर्थावळीचे अभंग वाचताना जाणवते.



Scanned by CamScanner

त्या संदर्भात पुढील अभंग पाहण्यासारखा आहे-

**"परी ऐसी ज्ञानराजा बोले जगजीवनू तू तंव सर्वज्ञ सुखमूर्ती ।।**
**परी एक मागणे आहे तुजप्रती । आठवण चित्ती असो दयावी ।।**
**हे कृपेने पोसणे माझे आवडते । क्षण एक जीवापरते नकरी कदा ।।**
**परी तुवा सांकडे घातले सर्वथा । दाटले अवस्था हृदय माझे ।।**
**आरूष साबडे नामे माझे वेडे मार्गी मागे पुढे सांभाळावे ।।**
**तहान भूक तूवां जाणावी जीवाची । मज चिंता याची थोर वाटे ।।**
**मग नामयाचा हात धरुनी श्रीपती । देतु असे हाती ज्ञानदेवा।।"**

वरील अभंगावरून असे लक्षात येते की, नामदेव लोकांना सांगू पाहतात की, हे जीवन सुखी समाधानी आहे. येथील लोक गुण्यागोविंदाने आपले जीवन जगत आहेत. तरीपण तुझ्याजवळ माझं एक मागणं आहे, जर तू सर्वज्ञ निर्गुण-निराकार आहे, अशी एक सोज्वळ लडवाळू सर्वत्र दिसणारी तुझी मूर्ती आहे. पण देवा या भोळ्याभाबड्या भक्तांवर तुझे लक्ष असू दे अशी आळवणी ते देवाजवळ करतात. असे हे माझे लडवाळू पणाचे बोलणे तू कृपा प्रसाद म्हणून घे आणि मी जे काही बोलत आहे, ते तू आवडून घे, क्षणाक्षणाला माझ्या मनात अनेक विचारांचे कल्लोळ दाटून आले. आणि काही प्रसंग माझ्या जीवाच्या पलीकडे मला असह्य झाले. तरी पण तू मला कधीच नकार दिला नाहीस. आणि म्हणूनच मी तुला माझे साकडे घातले देवा. जेव्हा जेव्हा माझ्यावर अनेक प्रकारची संकटे आली त्यावेळेस मी तुला आवर्जून हाक मारली. आणि या सर्वच कारणांमुळे माझे पाषाणहृदय दाटून आले. तुझ्या या भक्तीमध्येच मी वेडा झालो. मला कशाचीही भूक, तहान किंवा कुठल्याही गोष्टीत माझे लक्ष लागत नाही. सदैव तुझ्या नावाचा जप करण्याचे वेड मला लागले आहे. तूच पांडुरंगा मला येथून मागे आणि पुढेही तूच सांभाळ माझ्या मनाला लागलेली जी तहान भूक आता तूच भागव. मला याही गोष्टीची चिंता वाटते आणि अशा या नाम्याचा हात हातात धरून श्रीपतीबुवा ज्ञानदेवांच्या हातात देतात-

**"ऐसे सुखरूप दोघे चालताती । मार्गी परि चित्त पांडुरंगी नामयाचे ।।**
**क्षणाक्षणा वास परतून पाहे । वियोग न साहे पंढरीचा ।।**
**टोनी हृदय होती भाग । तू बंधू चुलता पंढरी राया ।।**
**इष्टमित्र तुचि । तुचि गणगोत तूचि । कुळदैवत आवडते ।।**
**तुझे बोलणे । तुजवांचुनी जाणे कवण दुजा ।।**
**नामा म्हणे आपले अनाथ । सांभाळी येऊनी हृदय कमळी । राहे माझ्या ।।"**



Scanned by CamScanner

संत नामदेव यांच्या अभंगावरून असे लक्षात येते की, हे पांडुरंगा तुझ्या दर्शनासाठी या रस्त्याने दोघे पाय चालत आहेत. तरी पण हे पांडुरंगा माझे चित्त तुझ्याच चरणी लागलेले आहे. क्षणाक्षणाला मागे मी परतोनी पाहत आहे. तरीपण तुझा वियोग मला असह्य करत आहे. म्हणून केशिराज आपल्याला सांगू पहात आहे की चिंतातुर झालोय माझे कोणीच जिवलग सखा मला इथे दिसत नाही. यामुळेच माझे पाषाण हृदय फुटोनी त्याचे जणू काही दोन्ही भाग झाले आहेत असे माझ्या मनाला वाटत आहे. हे पांडुरंगा तूच माझी जननी, तूच माझा बंधू, तूच सुखा, इष्टमित्र, गणगोत, कुळदैवत तूच, सगळे काही आहेस, तूच माझे सर्वस्व आहे. आणि म्हणूनच हे पाडूरंगा तुच माझे लक्ष आहे. तूच माझ्या साक्षी आहे. असे जरी माझे बोलणे मिस्किल पणाचे असले तरी तुझ्या वाचुनी माझे जीवन काहीच नाही. म्हणून अनाथाला आता तूच येऊन त्याचा सांभाळ कर आणि या अनाथाच्या यामध्ये राही असे मागणे संत नामदेव पांडुरंगाकडे मागतात.

**''तीर्थ करोनी नामा पंढरीये आला । जीवलगा भेटला विठोबासी ॥**
**सद्गदित कंठ वोसडला नयनी । घातली लोळणी चरणावरी ॥**
**परी पंढरीचे सुख पाहता कोटी । वाटे स्वप्नीही परी कोठे न देखेची ॥**
**उदंड तीर्थाची ऐको जाय प्रौढी । परि चित्त माझे वोढी चंद्रभागा ॥**
**तेणे पुढे माझे न चलती चरण । नाइकजी श्रवण कीर्ती त्यांची ॥**
**कटी तटी जेव्हा कर नाही ठेविले । न देखे पाऊले विटेवरी ॥''**

तीर्थाटन करून नामदेव जेव्हा पंढरीला आले तेव्हा त्यांना जिवलग पांडुरंग भेटला. पांडुरंग भेटल्यानंतर संत नामदेवांनी टाहो फोडून पांडुरंगाच्या चरणावरती लोळण घेतली. हे पांडुरंगा धन्य झालो मी तुझ्या चरणी, तरी तुझी कृपादृष्टी माझ्यावर सतत ठेवा' अशी विनवणी ते पांडुरंगास करतात. मी अज्ञानी असल्याकारणाने मी देशोदेशी हिंडलो परंतु पंढरीचे पराकोटीचे सुख मला कोठेच दिसले नाही. उदंड आयुष्यभर मी तीर्थयात्रा करीत राहिलो परंतु माझे मन, माझे चित्त हे पंढरीच्या चंद्रभागेकडेच आकर्षित होत राहिले. म्हणूनच हे पांडुरंगा तुझ्या चरणाजवळ मी आलो आहे. तूच माझा सांभाळ कर आणि तूच माझा माय-बापही हो, जेव्हा जेव्हा माझे हे डोळे तुझे सावळे रूप पहात नाही तोपर्यंत कुठल्याच प्रकारची पूजाअर्चा मी करत नाही. अशी आपली विरहावस्था ते आपल्या या अभंगातून व्यक्त करतात. अशा वेळेस माझे हातपायसुद्धा चालण्यास नकार देतात. माझे कानसुद्धा इतर काहीही श्रवण करण्यास तयार होत नाहीत. ज्या ज्या व्यक्तीने आजपर्यंत तुझ्या चरणावरती माथा ठेवला नाही किंवा कुठल्याच प्रकारचे व्रत-वैकल्य केलेले नाही अशा लोकांना पाहून माझे मन लाज्जित होते. या कष्टाचे वर्णन तुला मी काय



Scanned by CamScanner

सांगू. ज्या ज्या गावी मी जात होतो तेथे न वैष्णवांचा मेळा होता न सकाळच्या वेळची हरिकथा होती. ही सगळी दृश्ये पाहून माझ्या मनामध्ये एकप्रकारची खंत दाटून येत होती आणि मला तुझ्या भेटीची खूप ओढ लागत होती. असे ते आपले भावस्थितीचे वर्णन करून पांडुरंगाकडे तक्रार करतात, त्यातून त्यांचे पांडुरंगाशी असलेले दृढ नाते दिसून येते.

**समारोप :**

एकंदरीत नामदेवांच्या तीर्थावळीचे स्वरूप बघता त्यांच्या अभंगातून ईश्वरप्राप्ती व विठ्ठलाबद्दलची असणारी तळमळ, त्यांच्याशी त्यांचे असलेले भावनिक नातेसंबंध उलगडताना दिसतात. म्हणूनच संत नामदेवांचे 'तीर्थावळी'चे अभंग हे मानवी मनाला स्पर्श करणारे आहेत असे म्हणता येईल. कारण त्यातून विठ्ठलभक्ती व विठ्ठलापासून दूर जाणे, विठ्ठलाचा विरह या भावोत्कट अवस्थांचे प्रतिबिंब पडलेले आहे. तसेच त्यातूनच संत ज्ञानेश्वरांचा लाभलेला सहवास याबद्दलची धन्यता व्यक्त होताना दिसते. म्हणूनच 'तीर्थावळीचे अभंग' हे संत नामदेवांच्या भावजीवनाचे, भाववेड्या, भावभोळ्या मनाचे दर्शन घडविणारे आहेत असे म्हणता येते.

**संदर्भग्रंथ :**


१. सुंठणकर, बा. रं., 'मराठी संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य', आवृती दुसरी, पृ.८७.

२. तुळपुळे, शं. गो., 'पाच संत कवी', आवृती दुसरी, पृ.१७२.

३. ईनामदार, हे.वि., 'संत नामदेव : काव्य संभार आणि संत परिवार', मौज प्रकाशनगृह, मुंबई, पृ. ५६.


□□□

Scanned by CamScanner